ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १४ . पुणें, बुधवार तारीख १७ सप्टेंबर, १९५८ अंक १८

## विविध माहिती

**चहाच्या मळयांना कर्जे**—भारताच्या टी–बोर्डानें चहाच्या मळयाच्या धंद्याला कर्जे देण्याबाबत बँकांना सल्ला देण्यासाठी एक कमिटी नेमण्याचें ठरविलें आहे, अशी माहिती लोकसभेंत व्यापार व उद्योगखात्याचे उपमंत्री श्री. सतीशचंद्र ह्यांनीं सांगितली. कमिटीचें नांव प्लँटेशन फायनान्स कमिटी असें ठेवण्यांत येणार आहे.

**वृत्तपत्राला लागणारा कागद**—वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करणारा सार्वजनिक मालकीचा दुसरा कारखाना निझामाबाद येथें काढण्याचा सरकारचा विचार आहे. मध्यप्रदेशांतील नेपा कागदाचा कारखाना दोन महिन्यापूर्वीपर्यंत तोट्यांत चालत होता. पण तेव्हांपासून परिस्थितींत सुधारणा झाली असून आतां तोटा होण्याचें बंद झालें आहे.

**पोलादाच्या उत्पादनाला प्रारंभ**—रुरकेला, भिलई व दुर्गापूर ह्या ठिकाणीं बांधण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांपैकीं रुरकेला येथील कारखाना प्रथम, म्हणजे येत्या डिसेंबर महिन्यांत उत्पादनाच्या कार्यास प्रारंभ करील. त्यानंतर पुढील वर्षाच्या प्रारंभीं भिलई येथील कारखाना चालू होईल. १९५९ च्या दुसऱ्या सहामाहींत दुर्गापूरचा कारखाना चालू होईल.

**नुकसानभरपाईची मागणी**—न्यूयॉर्कमधील ' डेट्रॉइट प्रेस ' ह्या वृत्तपत्रांतील कामगारांनीं संप केल्यामुळें तें बंद ठेवावें लागलें. वृत्तपत्राच्या चालकांनीं कामगार संघावर १० लाख डॉलर्सच्या नुकसानभरपाईचा दावा लावला आहे. त्याशिवाय संपाच्या प्रत्येक दिवसामागें १॥ लाख डॉलर्सची मागणीहि चालकांतर्फे करण्यांत येत आहे.

**कलकत्यामधील ट्रॅमचे दर**—कलकत्ता येथील ट्रॅम कंपनी ब्रिटिश मालकीची आहे. कंपनीचे अध्यक्ष मि. वेब ह्यांनीं ट्रॅम कंपनीच्या वहातुकीच्या दरांत १ नया पैशाची वाढ केल्याचें जाहीर केलें आहे. १९५३ सालीं कंपनीनें अशीच दरवाढ केली असता हजारों लोकांनीं चळवळ करून तुरुंगवास पत्करला होता. त्यावेळीं कंपनीला माघार घेऊन दरवाढ रद्द करावी लागली होती.

**सरकारची धान्यखरेदी**—१९५८ सालीं मध्यवर्ती सरकारनें २,४३,४०० टन तांदूळ व २०० टन इतर धान्यें खरेदी केलीं, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. राज्य सरकारांपैकीं आसाम, मुंबई, केरळ, मध्यप्रदेश, म्हैसूर, ओरिसा व पश्चिम बंगाल ह्या राज्यांनींहि स्वतःसाठी धान्याची खरेदी केली.

**आंब्याच्या झाडाचें जतन**—आंध्र राज्यांत झहिराबाद तालुक्यांतील एका गांवांत विशिष्ट प्रकारच्या आंब्याचें फळ देणारा एक आम्रवृक्ष आहे. अशा जातीच्या आंब्याचें हें एकच झाड असल्यानें आंध्र सरकारनें त्याचें जतन करण्याविषयीं सूचना दिल्या आहेत. हें झाड तीनशें वर्षांचें जुनें असून अद्याप फळ देत आहे, असें म्हणतात.

**माजी सैनिकांसाठी विश्रांतिगृह**—पचमढी ह्या हवा खाण्याच्या ठिकाणीं मध्यप्रदेश सरकारनें माजी सैनिकांसाठी एक खास विश्रांतिगृह बांधलें आहे. ह्या कामासाठी सरकारला ३ लाख रुपये खर्च आला. विश्रांतिगृहांत १८ खोल्या आहेत. उन्हाळ्यांत माजी सैनिकांना रहातां यावें म्हणून तेथें सर्व प्रकारच्या सोयी करण्यांत आल्या आहेत.

**जपानी कंपनीचें साह्य**—भारत सरकारनें एका जपानी कंपनीच्या साह्यानें माती उकरणारीं व ढकलणारीं यंत्रें, ट्रॅक्टर्स, जमीन सपाट करणारीं यंत्रें, इत्यादि यांत्रिक साधनें तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. अशा प्रकारची यंत्रसामुग्री मुख्यतः धरणें बांधण्याच्या कामीं लागते. कारखान्याचा तपशील अद्याप ठरावयाचा आहे.

**हुंडाविरोधी बिल**—मद्रास विधानसभेंत हुंड्याला बंदी करणारें एक बिल एका कम्युनिस्ट सभासदानें प्रविष्ट केलें आहे. हुंड्याच्या प्रथेमुळें भारताच्या घटनेंत ग्रथित करण्यांत आलेल्या स्त्री–पुरुषांच्या समानतेच्या तत्त्वाला बाध येतो व मालमत्तेच्या सामायिक मालकीचा स्त्रीचा हक्क हिरावून घेतला जातो, असें बिलाच्या प्रवर्तकाचें म्हणणें आहे.

**आठ दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा**—पॅन अमेरिकन एअरवेज कंपनीच्या एका वैमानिकानें ८ दिवसांत पृथ्वीप्रदक्षिणा करण्यासाठी प्रवासास सुरवात केली आहे. वैमानिकाचें वय ३९ वर्षांचें असून त्याचें विमान एका एंजिनाचें व वजनानें हलकें आहे. न्यूयॉर्क, रोम, मुंबई, सिंगापूर, टोकिओ व मेक्सिको सिटी असा त्याचा मार्ग आहे.

**रशिआच्या सरशीची शक्यता**—पश्चिम जर्मनीचे शास्त्रज्ञ डॉ. ग्रँट्रिप ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, कांहीं झालें तरी चंद्रावर अग्निबाण सोडण्याच्या शर्यतींत रशिआ अमेरिकेवर मात करील. अहोरात्र काम करून रशिअन शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ही गोष्ट साध्य करतील. बहुधा ह्याच वर्षी ह्या प्रयत्न करण्यांत येईल.

**त्रिचूर येथें केबलचा कारखाना**—केरळ राज्यांत त्रिचूर येथें जपानच्या तांत्रिक साह्यानें केबल तयार करण्याचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या भांडवलापैकीं ४५ टक्के भांडवल जपानचें असेल. दरवर्षी सुमारें ५०० ते ६०० मैल लांबीची केबल तयार करण्यांत येईल असा अंदाज आहे.

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

### लक्ष्मी रोड, पुणें–२

रविवार दिनांक ७ सप्टेंबर १९५८ रोजीं झालेल्या वार्षिक निवडणुकींत सन १९५८–५९ सालाकरितां निवडून आलेलीं अधिकार-मंडळें.

**मा. सल्लागार मंडळ**—( १ ) मा. भट चिं. वा., अध्यक्ष, ( २ ) मा. टिळक वि. त्रिं., उपाध्यक्ष, ( ३ ) मा. कानगो श्री. अ., ( ४ ) मा. देशमुख गो. शं., ( ५ ) मा. देहाडराय य. बा.

**मा. कार्यकारी मंडळ** – ( १ ) मा. होनप वा. रा., कार्याध्यक्ष, ( २ ) मा. सुभेदार का. बा., उपकार्याध्यक्ष, ( ३ ) मा. डॉ. घारपुरे न. का., ( ४ ) मा. भणगे गं. मो., ( ५ ) मा. भोंडे र. पां., ( ६ ) मा. हर्डीकर वि. ल., ( ७ ) मा. गोखले ग. वि., ( ८ ) मा. मोघे अ. दा. ( ९ ) मा. परांजपे वा. कृ. (१०) मा. भट रा. द. व (११) मा. देशपांडे मो. पां.

**मा. स्थानिक आय-व्यय निरीक्षक**—( १ ) मा. देशपांडे रा. क. ( २ ) मा साठे व. का.

---

**धी बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.**

## जाहीर खबर

जाहीर करण्यांत येते कीं, ह्या बँकेची ४७ वी वार्षिक साधारण सभा शनिवार दिनांक २७ सप्टेंबर १९५८ रोजीं दुपारीं २–३० वाजतां ( स्टॅं. टा. ) बँकेच्या रजिस्टर कचेरींत ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई, ) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९५८ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफा वांटणीचा दर जाहिर करणें.

३. हिशेब तपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

४. पोट नियम ४७ (अ) मध्यें खालीलप्रमाणें जादा घालणें.

"Notwithstanding anything contained in Bye-law 47 (A) and Election Rules, a District Central Co-operative Bank newly registered and/or affiliated or Banking Unions operating in a District to which the area of operation of this Bank is extended hereafter may nominate a representative provided it or they acquires or acquire the qualifications on any day subsequent to 30th June of the preceding year".

संचालक मंडळाच्या हुकुमावरून,
वाय्. बी. गायतोंडे,
मॅनेजर.

मुंबई,
८ सप्टेंबर, १९५८

---

भागाच्या तबदिलाचें काम ( ट्रान्सफर बुकें ) ता. १५–९–१९५८ ते ८–१०–१९५८ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.


डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तारीख १३–९–१९५८ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल असतील त्यांना मंगळवार ता. १४–१०–१९५८ पासून मुंबई ऑफिसमधून त्याची रक्कम दिली जाईल.


सस्तु साहित्यवर्धक कार्यालयाचें
आगामी प्रकाशन
मधुमालतीनुं सौंदर्य
मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
गुजराती अनुवादक:
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.
प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले,
लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या
जेवणांत गोडी वाढते
व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?


किर्लोस्कर
अिलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकावू.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १७ सप्टेंबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकेंतील मंदी ओसरूं लागली

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँकेनें असें जाहीर केलें आहे कीं, गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर जी मंदी आली होती ती ओसरलेली आहे. ह्या मंदीमुळें अमेरिकेशीं व्यापार-व्यवहार करणाऱ्या परदेशांच्या सुवर्णनिधीवर आणि डॉलर्सच्या सांठ्यावर विपरीत परिणाम होईल अशी भीति व्यक्त करण्यांत येत होती. पण तसा परिणाम झाला नाहीं असें आढळून आलें आहे. आतां हळुहळु अर्थव्यवस्था पुन्हा मूळपदावर येऊं लागली असली तरी तिच्या गतीचा वेग निश्चित करता येण्यासारखा नाहीं. ह्यापूर्वीं आलेल्या मंदीच्या काळांतील अनुभव जमेस धरून परदेशांच्या सुवर्णनिधींत व डॉलर्सच्या सांठ्यांत घट होईल असा अंदाज निरीक्षकांनीं केला होता. पण ह्या खेपेस उलट अनुभव आला. मंदीच्या काळांत अमेरिकेशीं व्यापार करून परदेशांनीं आपल्या डॉलर्सच्या संचयांत सुमारें १०० कोटी डॉलर्सची भरच घातली आहे. त्याशिवाय आंतरराष्ट्रीय व्यवहार करणाऱ्या आर्थिक संस्था सोन्याचें उत्पादन, इत्यादि मार्गांनीं आणखी ७० ते ८० कोटी डॉलर्स परदेशांनीं मिळविले असावेत. परदेशांना झालेली ही मिळकत जितकी अनपेक्षित आहे तितकीच ती स्वागतार्ह आहे. कारण, मंदीच्या काळापूर्वीं आलेलें नुकसान भरून काढण्याच्या कामीं तिचा चांगला उपयोग झाला आणि आंतरराष्ट्रीय व्यापारांत रोख पैसा अनुपलब्ध झाल्यानें आर्थिक अरिष्ट उद्भवेल ही भीतीहि निराधार ठरली. पूर्वीं आलेल्या मंदींत मालाच्या व्यापारांत जशी अगतिकता आली होती तशी ती ह्या वेळेच्या मंदींत आली नाहीं. अमेरिकेंत आयात होणाऱ्या मालांत फारसा फरक झाला नाहीं; उलट निर्यात मात्र बऱ्याच प्रमाणांत घटली. म्हणूनच इतर देशांवर मंदीचा वाईट परिणाम झाला नाहीं.

## साखरेच्या उत्पादनाची किंमत खालीं आणण्याची सूचना

गेल्या आठवड्यांत राज्यसभेंत शुगर एक्सपोर्ट प्रमोशन बिलावर चर्चा करण्यांत आली. बिल लोकसभेनें आधीं मंजूर केलेलें आहे. बिलावर चर्चा करतांना काँग्रेस पक्षाचे सभासद आणि विरोधी पक्षाचे सभासद ह्या दोघांनींहि साखरेच्या उत्पादनाची किंमत कमी करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. साखरेच्या उत्पादनाची किंमत चढी असल्यामुळें तिच्या बाजारांतील किंमतीहि चढ्या आहेत. ह्या विषयासंबंधीं बोलतांना भारत सरकारचे रेव्हेन्यू व सिव्हिल एक्सपेंडिचर खात्याचे माजी मंत्री श्री. एम्. सी. शहा ह्यांनींहि उत्पादनाच्या चढ्या किंमतीविषयीं चिंता व्यक्त केली. ते म्हणाले कीं, सरकारनें ५०,००० टन साखर परदेशीं निर्यात करण्याचा प्रयत्न केला. पण, ह्या प्रयत्नाच्या पायीं देशांतील साखरेच्या ग्राहकांना फार मोठी किंमत द्यावी लागली. साखरेच्या जबर किंमतीमुळें भारतामधील ग्राहकांना १·४० कोटी रुपयांचा भुर्दंड द्यावा लागला आणि सरकारलाहि १·८० कोटी रुपयांचें नुकसान सोसावें लागलें. आतां ही खोट भरून काढण्यासाठीं साखरेवर जादा कर बसवावे लागण्याचा संभव आहे. काँग्रेसचे एक सभासद बिलावर बोलतांना म्हणाले कीं, भारतामधील साखर परदेशांतील पेठांतून विकण्यासाठी सरकारला आर्थिक मदत द्यावी लागते. पण, ह्या निर्यातीमुळें परदेशी चलनाची लक्षांत भरण्यासारखी प्राप्ति होते असें म्हणतां येत नाहीं. भारतामधील साखरेच्या किंमती जगांतील बाजारपेठेंत चालू असलेल्या किंमतीपेक्षा अधिक आहेत. अशा परिस्थितींत भारताला निर्यात चालू ठेवावयाची असल्यास तोटा सहन करण्याची तयारी ठेवावी लागेल. इतर कांहीं सभासदांचीं भाषणें झाल्यावर राज्यसभेनें बिल मंजूर केलें. निर्यातीसंबंधीच्या वटहुकुमाची जागा आतां हा कायदा घेईल.

## अविकसित देशांचा आर्थिक विकास

केंब्रिज विद्यापीठांतील प्रमुख अर्थशास्त्रज्ञ मि. पी. टी. बॉर ह्यांचें मुंबईंत एक व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय 'अविकसित देशांचा आर्थिक विकास' असा होता. मि. बॉर ह्या विषयावरील आपले विचार व्यक्त करतांना म्हणाले कीं, ज्या देशांचा औद्योगिक विकास कांहीं कारणानें खुंटला असेल त्यांची औद्योगिक प्रगति जलद घडवून आणण्यासाठी सर्वगामी आर्थिक नियोजन आणि सक्तीची बचत ह्यांची कांस धरावीच लागते असें सांगण्यांत येतें. पण हा दृष्टिकोन निर्दोष नाहीं. आर्थिक जीवनाचें सर्वगामी नियोजन आणि सक्तीची बचत ह्यांच्या साह्यानें सरकारनें उद्योगधंदे काढण्यांत पुढाकार घ्यावा असा हा उपाय आहे. ह्या उपायानें देशाच्या भांडवलाच्या संचयांत वाढ होते, असें म्हणतां येणार नाहीं. ह्या धोरणानें जें भांडवल जमलेलें असेल त्याला खाजगी मालकीच्या क्षेत्राकडून सार्वजनिक मालकीच्या क्षेत्राकडे फार तर वळवतां येईल. शिवाय दुसरें असें कीं सरकारी खर्च म्हणजे कांहीं सरकारी भांडवल-गुंतवणूक नव्हे. ह्या दोन्हींची गल्लत करतां कामा नये. ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू व सोयी ह्यांच्या निर्मितीनें सर्व प्रश्न सुटणार आहेत असें नाहीं, तर ज्या वस्तूंना व सुखसोयींना मागणी आहे त्याच्या उत्पादनांत वृद्धि झाली तरच त्याला अर्थ आहे. एखाद्या देशांत खाजगी मालकीचे उद्योगधंदे पुढाकार घेण्याच्या कामीं उत्सुक दिसत नाहींत असें जरी मानलें तरी तेवढ्यानें हा पुढाकार सरकारनें घ्यावा असें म्हणतां येणार नाहीं. कारण, सरकारशीं खाजगी उद्योगपतीजवळ असलेला मगदूर असेलच असें नाहीं. अर्थशास्त्रांत वस्तुस्थितीचें दर्शन घडविणारे सिद्धांत आणि आर्थिक विधिनिषेधात्मक सिद्धांत ह्यांच्यांत फरक करण्यांत येणें अगत्याचें आहे.

## रेल्वेच्या कांहीं खात्यांत हिंदी-इंग्रजी संयुक्त फॉर्म

रेल्वेच्या कांहीं खात्यांत हिंदी व इंग्रजी अशा संयुक्त फॉर्मांचा वापर सुरू करण्याचें ठरलें आहे. अशा संयुक्त फॉर्मांच्या पहिल्या गटांत १८ फॉर्म येतात. हे फॉर्म व्यापारविषयक खात्यासंबंधीं असून त्यांत फॉर्वर्डिंग नोटस, गुडस इन्व्हायसेस, रेल्वे पावत्या, पार्सल वे बिल्स, रिस्क नोट फॉर्म्स व इन्डेम्निटी नोटस यांचा समावेश होतो.

## उत्तर सातारा जिल्हा चेंबर ऑफ कॉमर्स

### ता. १-४-५७ ते ३१-३-५८ चा अहवाल

या चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना रोटरी क्लब, सातारा यांच्या प्रेरणेनें जरी पूर्वी झाली असली, तरी प्रत्यक्ष कामास सुरुवात साधारणपणें जून १९५७ पासून झाली. चेंबरचे सभासद त्यावेळीं १२/१३ होते. ती संख्या आतां म्हणजे अहवालाचे साल अखेर ३० झाली आहे. अहवालाचे सालीं मे. कूपर इंजिनिअरिंग हे सभासद झाले असून त्यांनीं आश्रयदाते म्हणून चेंबरला रु. ५०१ दिले आहेत. अहवालाचे वर्षात माननीय काकासाहेब गाडगीळ, श्रीमान भारत शेटजी ( सातारा रोड ), यांनीं भेटी देऊन व्यापाऱ्यांना उपयुक्त अशी माहिती दिली. श्रीमान भारत शेटजी यांचे भाषणाच्या प्रतीहि सभासदांना वाटल्या.

मध्यंतरीं कांहीं वस्तूंवरील विक्रीकर उठविणेंत आला. त्यावेळीं सभासदांना कांहीं अडीअडचणी व शंका निर्माण झाल्या, त्याचें निरसन व अडचणींतून मार्गदर्शन करणेसाठी चेंबरनें मे. सेल्स टॅक्स ऑफिसर सातारा यांना विनंति करून बोलावलें व त्याप्रमाणें त्यांनीं येऊन योग्य तो सल्ला दिला व त्याचा सभासदांना उपयोगहि झाला. सातारा म्युनिसिपालिटीनें जकात, उभा मार्ग, हडप, इत्यादि बाबत कांहीं नवीन कायदे केले व ते व्यापाऱ्यांना गैरसोईचे वाटत असलेमुळें त्याबाबतची अडचण त्यांना कळवली असून त्याबाबत योग्य तो विचार करणेबद्दलहि त्यांना लिहिलें आहे. अशा तऱ्हेनें चेंबरनें सभासदांना व व्यापारी बंधूंना अनेक प्रकारें सहाय्य केलें आहे. पुढील वर्षी खालीलप्रमाणें कामें करणेचा चेंबरनें विचार केला आहे :—

१ जिल्ह्यांत नवीन उद्योग सुरू होतील त्या दृष्टीनें पाहणें.

२ जिल्ह्यांत उद्योगधंद्याची वाढ होणेचे दृष्टीनें विचार करणें.

३ विमा कॉर्पोरेशनचें डिव्हिजनल ऑफिस परत सातारा येथें येणेंसाठी प्रयत्न करणें.

---

**बद्रीनाथाची यात्रा सुकर झाली**—हिमालयांतील बद्रीनाथाची यात्रा आतां सुकर झाली आहे. पिपलकोटी तें जोशीमठ हा मोटार रस्ता नुकताच तयार करण्यांत आला आहे रस्ता तयार करण्यासाठी १४ लाख रुपये खर्च आला. आतां बद्रीनाथाची यात्रा करण्यासाठी जाणाऱ्या यात्रेकरूंना अवघी १९ मैलांचीच वाटचाल करावी लागेल.

**रशिआचें नवें विद्युत्‌केंद्र**—रशियांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें दुसरें केंद्र चालू करण्यांत आलें आहे. सध्यां ह्या केंद्रांत १ लाख किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येते. त्यामधून जास्तींत जास्त ६ लाख किलोवॅट वीज निर्माण करतां येईल. १९५४ च्या जून महिन्यांत ५,००० किलोवॅट वीज निर्माण करणारें पहिलें अणुशक्ती-वीजकेंद्र रशिआंत चालू करण्यांत आलें.

## संगीताचा उत्पादन-वाढीकडे उपयोग

दिवंगत भारतीय शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस ह्यांनीं बऱ्याच वर्षांपूर्वी वनस्पति ह्या सजीव असून बाह्य उपाधींना संवेदनाक्षम असतात असें सिद्ध केलेलें आहे. तथापि त्यांच्या ह्या शोधाला केवळ शास्त्रीय महत्त्वच प्राप्त होणें साहजिक होतें. पण आतां मानवी जीवनांत त्यांच्या शोधाला व्यावहारिक महत्त्व प्राप्त होणार असें दिसतें. अन्नमलायी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्रेनें संगीताचा वनस्पतींच्या सजीव सृष्टीवर काय परिणाम होतो हें पाहण्यासाठी गेलीं कांहीं वर्षें प्रयोग चालविले होते. ह्या प्रयोगांवरून कांहीं गोष्टी सिद्ध झाल्या आहेत असें मानण्यास जागा आहे. विजेच्या घंटेच्या नादलहरींचा बियांवर अनुकूल परिणाम होऊन उत्तेजित होतात आणि बऱ्याच तास आधीं फलित होऊं लागतात असें आढळून आलें आहे. त्याचप्रमाणें नादलहरींच्या आघातामुळें कांहीं वनस्पति अधिक त्वरेनें वाढतात आणि आपल्या फळांचें अधिक उत्पादन करतात असेंहि दिसून आलें आहे. संगीताचा आस्वाद घेणाऱ्या वनस्पती अधिक उंच व कसदार झालेल्या दिसल्या. शिवाय त्यांची पूर्ण वाढहि लवकर होते. भात, तंबाखू, रताळें, ह्या वनस्पतींवर संगीत लहरींच्या आघाताचे प्रयोग करण्यांत आले असतां त्यांच्या उत्पादनांत वाढ झाली. कांहीं विशिष्ट संगीतानें भाताच्या उत्पादनांत ५० टक्के वाढ झाली. रताळ्यांच्या उत्पादनांत ४० टक्के वाढ झाली. तंबाखूच्या वनस्पतीला, व्हायोलिनचे स्वर ऐकविण्यांत आले असता उत्पादनांत ५० टक्के वाढ झाली. नियंत्रित भौतिक परिस्थितींत ठेवलेल्या प्रयोगशाळांतील ह्याच वनस्पतीच्या उत्पादनाशीं ही तुलना केलेली आहे. अन्नमलायी विद्यापीठांत करण्यांत आलेले हे प्रयोग जर मोठ्या प्रमाणावर शेतांतून करता येण्यासारखे असले तर भारताच्या अन्नधान्याच्या उत्पादनांत भर टाकण्याचा एक नवीन उपाय सांपडला असें होईल.

---

**जपानकडून खताची आयात**—परदेशांकडून रासायनिक खतें आयात करण्याच्या भारताच्या धोरणाप्रमाणें जपानकडून ३५ लाख डॉलर्स किंमतीचीं खतें आयात करण्यांत येणार असल्याचें समजतें. एकूण ८० लाख डॉलर्सचीं खतें आयात करण्यांत येणार आहेत. पहिला हप्ता ७ लाख डॉलर्स किंमतीच्या खताचा असेल.


# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] सारस्वत बँक गृह, मुंबई ४ [ टेलिफोन २७०९४

—दरमहा १ ते १०० रुपये नियमित बचतीकरितां—

**रिकरिंग डिपॉझिट खातें** आजच उघडा

**व्याज ३॥ ते ४ टक्के**

: बँकेच्या शाखा :

फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, मुंबई ४.

## पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशनचा १९५६–५७ मधील कारभार

### म्यु. कमिशनर, श्री. नाईक ह्यांचा अहवाल

१९५६–५७ चा श्री. ए. एस. नाईक, आय. सी. एस., ह्यांचा अहवाल छापून प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून अहवालाच्या वर्षांतील प्रगतीची उत्कृष्ट कल्पना येते. अहवालांतील प्रमुख बाबी येथें दिग्दर्शित केल्या आहेत :—

(१) लॉइड्स ब्रिज जवळील नव्या इमारतींत कॉर्पोरेशनच्या कचेऱ्या गेल्या, म्हणजे विश्रामबागवाडा व शनिवार इमारत हीं रिकामीं होऊन शाळा वगैरेसाठी त्या उपलब्ध होतील. सध्यांच्या कॉर्पोरेशन हॉलमध्यें रिजनल लायब्ररी येईल.

(२) अहवालाच्या वर्षी ६ लक्ष रु. खर्चून शाळांसाठी सहा नव्या इमारती बांधण्यांत आल्या.

(३) १९५१ मध्यें लोकसंख्या ४,८०,९८२ होती. ती आतां ६,०७,००० झाली आहे. १९,१९८ जन्मांची व ६,८८७ मृत्यूंची नोंद झाली.

(४) प्राथमिक शाळांतील ११,१४६ विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्यांत आली. त्यांतील ४,९४५ म्हणजे ४४·७% विद्यार्थ्यांची प्रकृति सदोष आढळली.

(५) कचरा व घाण गोळा करून निकालांत काढली, त्याचें वजन ९९,८८२ टन होतें.

(६) कॉर्पोरेशनच्या स्टोअर्सनें ३२,४५,००० रुपयांची खरेदी केली.

(७) फायरब्रिगेड स्टेशन्सकडे ८० बोलावणीं आलीं. आगीमुळें ८० हजार रुपयांचें नुकसान आलें.

(८) कॉर्पोरेशनच्या अँब्युलन्सचा ९१२ वेळां व प्रेतवाहक मोटारगाडीचा १,०१७ वेळां उपयोग करण्यांत आला.

(९) ५,८७० नवे विजेचे दिवे बसविण्यांत आले. त्यापैकी ३,३७८ हे ४० वॉटचे व १,०३७ हे ६० वॉटचे होते. रस्त्यांवरील दिव्यांसाठी विजेचा १,६३,३६८ रु. खर्च आला.

(१०) म्यु. कमिशनरसाठी बंगला बांधला, त्याला ७०,००० रु. लागले. त्यांच्या नोकरांसाठी जागा, तबेला, भोंवतालची भिंत, इत्यादीस आणखी २२,००० रु. लागले.

(११) म्युनिसिपल ट्रॅन्सपोर्टच्या बसेसनीं एकूण २३,७५,३८२ मैलांचा प्रवास केला; त्यासाठी २६,८७,९४५ रु. ची वसुली झाली. एकूण २,७४,४२,११३ उतारूंची वहातूक करण्यांत आली. दर मैली रु. १–२–० उत्पन्न मिळालें; त्यापूर्वीच्या वर्षी तें रु. १–१–७ एवढें होतें. बसेसची संख्या १०२ आहे.

(१२) शिवाजी आखाड्याजवळील रिकामी जागा फटाक्यांच्या दुकानांना भाड्यानें दिली, त्याचे १८,००० रु. मिळाले. सायकल स्टँडच्या लिलावांचें उत्पन्न ४,३६५ रु. झालें.

(१३) कॉर्पोरेशनच्या एकूण १० भाजी मार्केटांचें मिळून ३,७७,६५६ रु. उत्पन्न मिळालें. त्यांपैकी एकट्या महात्मा फुले मार्केटानें ३,३९,९७२ रु. दिले.

(१४) एकूण ३४,९०१ मालमत्तांवर कर घेतला जातो; त्यांचे करासाठी धरलेलें भाड्याचें उत्पन्न २,५५,०५,८७४ रु. आहे.

(१५) एकूण ५८,००६ सायकलींबाबत १,१५,१५६ रु. कर जमा झाला. ७७३ हॉटेलांनीं मिळून ६५,९६३ रु. कर भरला.

(१६) खालील तक्ता आर्थिक परिस्थिति दर्शवितो:—

| | १९५५–५६ रु. | १९५६–५७ रु. |
|---|---|---|
| प्रारंभींची शिल्लक | ५२,५४,१७२ | ४७,८०,२७० |
| उत्पन्न | १,२६,८९,४९८ | १,३७,८०,२१५ |
| खर्च | १,१९,१६,००० | १,४३,५९,१५९ |
| वाढावा किंवा तूट | ७,७३,४९८ (वाढावा) | ५,७८,९४४ (तूट) |
| शिल्लक | ६०,२७,६७० | ४२,०१,३२६ |
| ॲडव्हान्सेससाठी राखलेली रक्कम | १२,४७,४०० | १२,०३,८६७ |
| अखेरची शिल्लक | ४७,८०२७० | २९,९८,४५९ |

कॉर्पोरेशनला २,३२,५३,१०० रु. चें कर्ज फेडावयाचें आहे. सिंकिंग फंड ५०,१४,७२५ रुपयांचा आहे.

---

### सासवड माळी शुगर फॅक्टरीचा गणेशोत्सव

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. चा श्रीगणेशोत्सव प्रतिवर्षीप्रमाणें माळीनगर येथें साजरा होणार आहे. भजन, गायन नाटकें, पोवाडे, कीर्तनें, जादूचे प्रयोग, श्रीसत्यनारायण, हळदी–कुंकू समारंभ, इत्यादि कार्यक्रम आंखण्यांत आले आहे.

---

### "पेट्रोल सांपडेल, हें आधीं कसं कळतं ?"

एका पेट्रोल कंपनीच्या वार्षिक सभेंत अध्यक्ष भागीदारांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत होते. उपस्थित स्त्रियांपैकी एकीनें प्रश्न विचारला, "अध्यक्षमहाराज, मला एक खुलासा हवा आहे. रस्त्याच्या कोपऱ्यांवर तुम्हीं नवे पेट्रोल पंप बसवितां, तेव्हां तिथं खाली तेल सांपडेल, हें तुम्हांला आधीं कसं कळतं ?"


दि

**बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

—भांडवल—

वसूल भांडवल ( भागापोटीं आगाऊ जमा झालेल्या रकमा धरून ) रु.२६,००,०००चे वर

गंगाजळी व इतर निधि ...रु.११,५०,०००

एकूण खेळतें भांडवल ...रु. दहा कोटींचे वर

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)

श्री. धों. कृ. साठे श्री. फ. दो. पदमजी

श्री. मा. वी. शहा श्री. भा. म. गुप्ते

श्री. म. बा. जांभेकर श्री. म. स. पारखे

**बँकेची ४४ वी शाखा**

१६७ ए पूनावाडी, व्हिन्सेन्ट रोड, दादर मुंबई १४ येथें ता. ६ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे.

मुख्य कचेरी, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २

चिं. वि. जोग मॅनेजर

## गेल्या २० वर्षांतील भारतीय रेल्वेवरील अपघात

रेल्वे खात्यानें, गेल्या २० वर्षांतील रेल्वेअपघातांची माहिती देणारी एक छापील पुस्तिका संसद सदस्यांत प्रसृत केली आहे रेल्वेमंत्रि श्री. जगजीवनराम यांनीं कांहीं दिवसांपूर्वी संसद सदस्यांत असें पुनर्विलोकन प्रसृत करण्याचें काम हातीं घेतलें होतें.

या पुनर्विलोकनांत रेल्वेअपघातांची संख्या व स्वरूप, त्यांत मृत्युमुखीं पडलेल्यांची संख्या, अपघातांच्या कारणांनुसार त्यांची विभागणी व या आंकडेवारीची ब्रिटिश व अमेरिका रेल्वे अपघाताच्या अशा आंकडेवारीची तुलना व पृथःकरण देण्यांत आलें आहे.

या पुस्तिकेंत भारतांतील रेल्वेच्या कामकाजाची चौकशी, अपघातांच्या चौकशीची पद्धत व अपघातांचें प्रमाण कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासकांनीं योजलेले निरनिराळे उपाय यांची, माहिती देण्यांत आलेली आहे.

### अपघातांची संख्या

स्वातंत्र्योत्तर कालांत १९४८–४९ मध्यें सर्वांत जास्त म्हणजे २४१२० अपघात झाले. हा आंकडा क्रमशः कमी होत होत १९५७–५८ मध्यें ९०११ वर आला. या आंकड्यांत गंभीर स्वरूपाच्या १७ अपघातांचा समावेश होतो. या अपघातांची सरकारी रेल्वे इन्स्पेक्टरांनीं चौकशी केली आहे.

या पुस्तिकेंत 'अपघात' हा शब्द व्यापक अर्थी वापरला असून १९५७–५८ च्या ९०११ अपघातांत १,६६१ म्हणजे १८·४ टक्के अपघात गाड्या गुरांढोरांवरून गेल्यामुळें, ४,८२५ म्हणजे ५६·५ टक्के अपघात इंजिनच्या डब्यांत व कायम रेल्वे मार्गांत बिघाड झाल्यामुळें तर बाकीचे अपघात गाड्यांची टक्कर, रुळांवरून गाडी घसरणें, गाड्यांत व स्टेशनांत आगी लागणें, इ. मुळें असल्याचें नमूद केलें आहे.

सदर अपघातांपैकी १९४७–४८ मधील अपघातांत सर्वांत जास्त म्हणजे दर १० कोटी उतारूमागें १०२ माणसें मृत्युमुखीं पडलीं. १९५५–५६, १९५६–५७ व १९५७–५८ चे हेच आंकडे अनुक्रमें २१, ४५ व ३२ असें आहेत.

### परदेशांतील रेल्वेशीं तुलना

निरनिराळ्या देशांतील भिन्नभिन्न परिस्थितीमुळें तुलनेच्या दृष्टीनें आंकड्यांचा काटेकोरपणें विचार करतां येत नसला तरी परदेशांतील रेल्वेअपघातांची आंकडेवारी सर्वसाधारण मार्गदर्शनासाठी विचारांत घेतां येईल, ही गोष्ट सदर पुस्तिकेंत निदर्शनास आणण्यांत आली आहे.

भारत, ब्रिटन व अमेरिका या देशांत झालेल्या अपघातांची संपूर्ण आंकडेवारी १९५५–५६ या वर्षापुरती उपलब्ध आहे. या वर्षांत भारतीय रेल्वेवर दर १० कोटी मैल प्रवासांत गाड्यांची ३६ वेळां टक्कर होऊन त्यांत ११ उतारू गाड्या सांपडल्या होत्या, तर ब्रिटिश रेल्वेवर १९५५ मध्यें १८ उतारू गाड्यांसह एकूण ९८ वेळां गाड्यांची टक्कर झाली होती. अमेरिकेंत याच वर्षांत २८९ वेळां गाड्यांची टक्कर झाली. त्यांत सांपडलेल्या उतारू गाड्यांची आंकडेवारी उपलब्ध नाहीं.

भारतांत रुळावरून गाड्या घसरल्यानें झालेल्या अपघातांचा विचार करतां त्यांची संख्या इंग्लंडपेक्षा जास्त, परंतु अमेरिकेपेक्षा कमी असल्याचें दिसून येतें.

### अपघातांचीं कारणें

भारतीय रेल्वेवर १९४१–४२ पासून झालेल्या २७७ गंभीर अपघातांची कारणमीमांसा या पुस्तिकेंत देण्यांत आली असून त्यांतील ४१·८ टक्के अपघात रेल्वेनोकरवर्गाच्या चुकीमुळें घडून आल्याचें म्हटलें आहे. डबे व कायम मार्गांत बिघाड झाल्यानें १९·८ टक्के, गाड्यांची मोडतोड झाल्यानें ११·२ टक्के व आगीमुळें १०·५ टक्के अपघात झाल्याचें या पुस्तिकेंत म्हटलें आहे.

### भारतीय रेल्वेच्या कामकाजाची माहिती

रेल्वे अपघातांचा विचार करतां, कोठल्याहि देशांतील रेल्वेच्या कामकाजाच्या व्याप्तीचा अपघातांवर होणारा परिणाम विचारांत घेतला पाहिजे असें या पुस्तिकेंत म्हटलें आहे.

### अपघातांचें प्रमाण कमी करण्यासाठी योजलेले उपाय

अपघातांचें प्रमाण कमी करण्यासाठी रेल्वे–प्रशासकांनीं योजलेल्या उपायांची तपशीलवार माहिती या पुस्तिकेंत देण्यांत आली आहे.

रेल्वे अपघात होण्यास प्रामुख्यानें मानवी चुकाच कारणीभूत होतात. रेल्वे नोकरवर्गास रेल्वेचें कामकाज सुरक्षितपणें चालविण्यासाठी घालून दिलेल्या नियमांचें ज्ञान नसल्यामुळें हे अपघात झाले असें म्हणण्यापेक्षा त्यांची नीतिभ्रष्टता, हलगर्जीपणा, व बेशिस्तच त्यास अधिक जबाबदार आहे आणि म्हणून हा प्रश्न मानसशास्त्रीय तसेंच शिक्षणात्मक दृष्टिकोनांतून सोडविला पाहिजे. यानुसार अनेक व्यवहार्य असे उपाय योजण्यांत आले आहेत.

या उपाययोजनांत इतर गोष्टींबरोबरच अधिक चांगल्या प्रकारची देखरेख व नियमन, अपघातांचा अभ्यास, यंत्रसामग्रींत बिघाड होण्याचें प्रमाण कमी करणें, रेल्वे मार्ग व पूल चांगल्या सुस्थितींत ठेवणें आणि पूर इत्यादि पासून त्यांचा बचाव करणें, यांसारख्या उपाययोजनांचा समावेश होतो.

नेहमीं अपघात कशामुळें होतात त्याचीं कारणें शोधून काढण्याच्या दृष्टीनें प्रत्येक रेल्वेवर निरनिराळ्या स्वरूपाच्या अपघातांचें पृथक्करण करणारीं संशोधन केंद्रें स्थापण्यांत आलीं आहेत. यामुळें हे अपघात टाळण्यासाठी आवश्यक त्या उपायांची योजना करतां येईल

याच दृष्टीनें रेल्वेच्या केंद्रस्थानींच नव्हे, तर प्रत्येक रेल्वे जिल्हा, विभाग व कारखान्यांतहि सुरक्षासंघटनांची स्थापना झाली आहे.

---

## दुसऱ्या योजनेच्या कालांत मुंबई राज्यांतील ७०० खेड्यांना वीजपुरवठा

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत भारतांतील एकूण १२,९३० खेड्यांस विजेचा पुरवठा होईल. या खेड्यांची राज्यनिहाय वांटणी पुढीलप्रमाणें आहेत:—

आसाम २९, बिहार १२८५, मुंबई ७८०, केरळ १३४४, मद्रास ५०००, मध्य प्रदेश ३२९, म्हैसूर ७००, ओरिसा २२३, पंजाब २१००, राजस्थान ११३ उत्तर प्रदेश २२५, केंद्रशासित प्रदेश ८७२.

यांपैकी ५,७३७ खेड्यांना ३१ जुलै १९५८ पूर्वीच विजेचा पुरवठा होऊं लागला आहे. बाकीच्या ७,१९३ खेड्यांत दुसऱ्या योजनेच्या अखेरीपर्यंत वीज नेण्यांत येईल. सन १९५८–५९ मध्यें २,३८४ खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यांत येईल.

## महाराष्ट्र बँकेचें दक्षिण विभागांतील शाखांचें स्नेहसंमेलन

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या दक्षिण विभागांतील शाखांचें दुसरें स्नेहसंमेलन कोल्हापूर येथें ता. ३१–८–१९५८ व १–९–१९५८ रोजीं पार पडलें. ता. ३१–८–१९५८ रोजीं सकाळीं ६॥ पासून मंगल चौघडावादनाचे कार्यक्रमास येथील वैश्य समाज बोर्डिंग, शाहुपुरी येथें सुरवात झाली.

प्रथम येथील शाखेचे शाखाधिकारी श्री. एम्. बी. क्षीरसागर यांनीं संमेलनाची रूपरेखा सर्व उपस्थितांना सांगितली. त्यानंतर सर्वांनीं आपआपला परिचय करून दिल्यानंतर जनरल मॅनेजर श्री. सी. व्ही. जोग यांनीं बँकेचे उद्देश व स्नेहसंमेलनामुळें खेळीमेळीचें वातावरण कसें निर्माण होतें याबद्दल चार शब्द सांगितले.

दोनप्रहरीं भोजन कार्यक्रम झाल्यानंतर 'पन्हाळा' येथें सर्व मंडळी ट्रिपसाठी जाऊन आली. रात्रीं श्री. विष्णुपंत जोग यांचें 'नाटक व सिनेमामधील माझे अनुभव' या विषयावर मोठें मार्मिक, साभिनय व विनोदी भाषण झालें. त्यानंतर कुमार श्रीखंडे यांनीं शास्त्रीय संगिताच्या तीन चिजा गाऊन दाखविल्या. तदनंतर श्री. नंदा कुलकर्णी यांचें सतार वादन व शेवटीं बँक-स्टाफ मेंबर्सपैकी श्री. बंडोपंत साठे यांचें पेटीवादन झाल्यानंतर तारीख ३१–८–१९५८ चा कार्यक्रम संपला. या कार्यक्रमास शहरांतील बरेच प्रमुख नागरिक उपस्थित होते.

दुसरे दिवशीं (ता. १–९–१९५८) सकाळीं ९॥ वाजतां येथील स्थानिक व्यापाऱ्यांचा परिचय बँकेचे ज. मॅनेजर यांनीं करून घेतला व व्यापाऱ्यांच्या अडीअडचणींची माहिती करून घेतली व बँकेचा व्यापाऱ्यांना कशा रीतीनें उपयोग करून घेतां येईल याची माहिती दिली.

आभारप्रदर्शन करतांना येथील उद्योगपती श्री. रामभाई सामाणि (बँकेचे स्थानिक सल्लागार) यांनीं बँकेनें आपल्या उद्देशाप्रमाणेंच आतांपर्यंतची कार्यपद्धत ठेवली आहे, यामुळेंच दिवसेंदिवस बँकेचें कार्यक्षेत्र व्यापक होत आहे असें सांगितलें.

दुपारीं भोजनानंतर निरोपसमारंभ होऊन हा कार्यक्रम समाप्त झाला.

### कोयना योजनेसाठीं मध्यवर्ती सरकारचें साह्य

मध्यवर्ती सरकारनें कोयना योजनेच्या अंमलबजावणीसाठीं मुंबई राज्य सरकारला ३१ मार्च १९५८ ला संपलेल्या काला-पर्यंत कर्जादाखल ९१० लाख रु. दिले आहेत. ३१ मार्च १९५९ ला संपणाऱ्या चालू आर्थिक वर्षांत मुंबई राज्यास सदर योजनेवर येणाऱ्या खर्चासाठीं कर्जादाखल ७ कोटी रु. देण्याची तरतूद मध्यवर्ती अर्थसंकल्पांत करण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत या योजनेसाठीं जास्तींत जास्त २९ कोटी रु. खर्चण्याचें ठरलें आहे. ही रक्कम तसेंच साधन-सामग्रीची उपलब्धता, टप्प्याटप्प्यानें रक्कम खर्च करण्याचा कार्यक्रम इ. गोष्टी विचारांत घेऊन या राज्यास दरवर्षी पैसा देण्यांत येतो.

## सरकारनें देशांत केलेली अन्नधान्यांची खरेदी

मध्यवर्ती सरकारनें १९५६–५७ मध्यें १५७२·७ हजार टन गव्हाची व ५५५१ टन तांदळाची तर १९५७–५८ मध्यें ३०३३·१ हजार टन गव्हाची व ६०६·९ हजार टन तांदळाची देशांत खरेदी केली.

या अन्नधान्यांपैकी मालाची मागणी केलेल्यास व राज्य सरकारांस परस्पर पाठविण्यांत आलेलें अन्नधान्य वगळतां आयात केलेल्या व देशांत खरेदी करण्यांत आलेल्या सर्व अन्नधान्याचा सांठा करण्यांत आला.

सांठवून ठेवण्यांत आलेल्या अन्नधान्यापैकी वजनाच्या निर-निराळ्या पद्धति, अन्नधान्याची उलाढाल व वाहतूक यांमुळें कांहीं नुकसानी झाली. या हानीस 'हिशेबांत न घेतलेला सांठा' असें म्हणण्यांत येतें. यानुसार १९५६ मध्यें २०,००० रुपये किंमतीच्या ४७·५६ टन गव्हाची हानि झाली व ३७,२०० रुपये किंमतीचा ८६·२९ टन गहूं हिशेबांत धरण्यांत आला नाहीं. त्याचप्रमाणें या वर्षांत ६३,००० रु. किंमतीच्या १०८·५८ टन तांदळाची हानि झाली तर ९,११,००० रु. किंमतीचा १५६४·२५ टन तांदूळ हिशेबांत धरण्यांत आला नाहीं.

१९५७ मध्यें १,४३,६०० रुपये किंमतीच्या ३२०·९९ टन गव्हाची हानि झाली तर ६५,१०० रुपये किंमतीचा १४५·४४ टन गहूं हिशेबांत धरण्यांत आला नाहीं. याच वर्षांत १,८४,००० रुपये किंमतीच्या ३११·७८ टन तांदळाची हानि झाली तर ३,१२,००० रुपये किंमतीचा ५२६·५३ टन तांदूळ हिशेबांत धरण्यांत आला नाहीं.

निरनिराळ्या राज्यांस १ जानेवारी, १९५८ ते ३१ जुलै, १९५८ पर्यंत १४६७ हजार टन गव्हाचा व ३६२ हजार टन तांदळाचा पुरवठा करण्यांत आला. या व्यवहारांत गव्हाची विक्रीची किंमत दरमणीं १४ रुपये व तांदुळाची किंमत दर्जानुसार दरमणीं १६ ते २० रुपये अशी होती.

### खादी ग्रामोद्योग भवनांनीं केलेली विक्री

मुंबई येथील खादी ग्रामोद्योग भवनानें १९५७–५८ मध्यें एकूण २२,३८,५४० रु. किंमतीच्या खादीची व खादी मालाची विक्री केली. १९५६–५७ व १९५५–५६ चे हेच आंकडे अनुक्रमें १९,२५,१२३ रु. व १६,७१,२७० रु. असे होते.

नवी दिल्ली येथील खादी ग्रामोद्योग भवनानें १९५७–५८ मध्यें २९,२९,१४६ रु. १० नये पैसे किंमतीच्या मालाची विक्री केली. १९५६–५७ व १९५५–५६ चे हेच आंकडे अनुक्रमें २३,९७,२५६ रु. २ आ. ९ पै व १४,०३,२३१ रु. १४ आ. ६ पै असे होते.

ऑक्टोबर १९५७ मध्यें स्थापन झालेल्या मद्रास येथील खादी ग्रामोद्योग भवनानें मार्च, १९५८ अखेर २,०१,७९९ रु. किंमतीचा माल विकला, तर जानेवारी १९५८ मध्यें स्थापन झालेल्या कलकत्ता येथील खादी ग्रामोद्योग भवनानें मार्च १९५८ अखेर १,५९,३२४ रु किंमतीच्या मालाची विक्री केली. खादी व खादी माल यासाठीं होणारी मागणी खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून बहुतांशीं पुरविली जाते.

दातांच्या स्वच्छतेसाठीं
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणे शहर

शाखाः—पुणे लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. | १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,९०,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार खुर्द, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर, मुंबई-फोर्ट व मार्केट यार्ड (सांगली)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ८५,५०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०१,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दरः

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३–०–० | रु. ३–४–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २–०–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–८–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | डॉ. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.